महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक :** 1442/गट-क संयुक्त-लि.ट./2021/24 **बैठक क्रमांक :** **दिनांक :** 18 सप्टेंबर,2023

**प्रति ,**

**PATIL VAISHNAVI VILAS (01005820221307220011545)**

**विषय :- महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा - 2021 लिपिक-टंकलेखक (मराठी) गट-क या पदावरील शिफारशीबाबत (जा.क्र 58/2022)**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस असे कळविण्यात येते की, दिनांक 17 ऑगस्ट, 2023 रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या अंतिम निकालानुसार 'महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा - 2021' मधून आपली 'लिपिक-टंकलेखक (मराठी) गट-क ' या संवर्गातील नियुक्तीकरिता 'प्रधान सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (14-अ), मंत्रालय, मुंबई-400 032' यांचेकडे शिफारस करण्यात येत आहे.

2. प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्याआधारे आपण अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने आपली मूळ प्रमाणपत्रे नियुक्तीपूर्वी शासन स्तरावर तपासण्याच्या अधीन राहून शिफारस करण्यात येत आहे. शिफारसपात्र उमेदवारांची पात्रता, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, NCL तसेच सामाजिक व समांतर आरक्षण आणि दिव्यांगत्वविषयक दावे आपल्या मूळ प्रमाणपत्रांआधारे नियुक्तीपूर्वी शासनाच्या विहित/सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तपासून पात्र ठरल्यासच आपणास विषयांकित पदावर नियुक्ती देण्यात येईल.

3. प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व मा.उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विविध मुळ अर्ज/याचिका प्रकरणी होणाऱ्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

4. वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा गुणवत्तेनुसार खुला (सर्वसाधारण) वर्गवारीसाठी विचार करण्यात आला असून मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादेत घेतलेली सवलत ही खुल्या प्रवर्गातील पदांसाठी अपात्रता समजण्यात येणार नाही. म्हणजेच सवलतीच्या वयोमर्यादेसह त्यांना खुल्या पदांसाठी पात्र समजले जाईल. तसेच मागासवर्गीयांना देय असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेतलेल्या सर्व सामाजिकदृष्टया मागासवर्गीय तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांकरीता पदे आरक्षित असलेल्या जाहिरातींच्या बाबतीत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांचा अराखीव पदावरील निवडीकरीता पात्र समजले जाईल. असे असले तरी वयोमर्यादेत सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव पदासाठी विचार शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अधीन राहून घेण्यात आला आहे.

5. प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने आपली पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून आपली शासनाकडे शिफारस करण्यात येत असल्याने आपण आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरल्यास आपली उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

6. अर्जामध्ये खोटे/चुकीचे दावे करणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. यासंदर्भात आपले लक्ष उमेदवारांच्या सर्वसाधारण सूचना व आपण सदर परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील प्रतिज्ञापत्राकडे वेधण्यात येत आहे.

7. साक्षांकन नमुना आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर साक्षांकन नमुना

डाऊनलोड (Download) करुन घेण्यात यावा व संपूर्ण भरुन परस्पर नियुक्ती देण्यात आलेल्या शासनाच्या संबंधित विभागास/कार्यालयास तात्काळ सादर करावा. साक्षांकन नमुन्यातील रकाना क्रमांक 11 मध्ये अटक, शिक्षा, दंड व इतर कारवाई झाली असल्याबद्दलची माहिती "होय" किंवा "नाही" या उत्तराने भरावी. संबंधित रकाना कोरा ठेवल्यास किंवा नुसती रेघ मारल्यास असा नमुना स्वीकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

8. नियुक्तीसंदर्भातील पुढील सर्व पत्रव्यवहार उपरोक्त प्राधिकाऱ्यांकडेच करण्यात यावा.

**आपला विश्वासू ,**

**(रा. ह. झटके)**
**अवर सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई**